MHWS080012992022

**<u>रे.दि.मु.क्रं. ९१/२०२२ मधील निशाणी क्र. २८ वरील आदेश</u>**

प्रस्तुतची नोटीस वादी तर्फे प्रतिवादी यांना अर्जात नमूद कागदपत्रे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम २ अन्वये मान्य करण्याबाबत दिलेली आहे.

**२.** वादीचे नोटीसीतील कथनानुसार, वादीतर्फे याकामी खालील कागदपत्रे दाखल केलेली असून ती प्रतिवादींनी पाहिलेली आहेत. सदरची कागदपत्रे मुळ स्वरुपात असल्याने त्यांना प्रतिवादींनी मान्य करणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादींनी खालील कागदपत्रे मान्य करण्याबाबत नोटीस देण्यात येते.

१. मोजणी नकाशा गट क्र.२२७

२. मोजणी नकाशा गट क्र.२२५

३. मोजणी नकाशा गट क्र.२२६

४. मोजणी नकाशा गट क्र.२२८

५. गट क्र.२२५ चा सातबारा उतारा

६. गट क्र.२२६ चा सातबारा उतारा

७. गट क्र.२२७ चा सातबारा उतारा

८. गट क्र.२२८ चा सातबारा उतारा

९. फेरफार क्र.४२४ चा उतारा

१०. फेरफार क्र.७८४ चा उतारा

११. फेरफार क्र.९२४ चा उतारा

**३.** सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, नोटीसीत नमूद मोजणी नकाशा हे सार्वजनिक दस्तऐवज नाहीत त्यामुळे सदरचे कागदपत्रे पुराव्यादवारे शाबीत करणे आवश्यक आहे. उर्वरीत कागदपत्रे ही मूळ अथवा प्रमाणीत असल्यास त्यांना सार्वजनिक दस्तऐवज म्हणता येईल त्यामुळे नोटीसीस विरोध दर्शवला.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा ताबा व दरम्यानचे उत्पन्नाकरिता दाखल केलेला आहे. सदर कामी वादीतर्फे कागदयादी नि.क्र.४ सोबत अर्जात नमूद कागदपत्र क्र.०१ ते ०३, ०५ ते ०७ व ०९ ते ११ दाखल केलेले असून कागदपत्र क्र.०४ व ०८ याकामी दाखल केल्याचे दिसून येत नाही. सदर कागदपत्रांपैकी कागदपत्र क्र.०५ ते ०७ व ९ ते ११ हे मूळ/प्रमाणीत प्रतीत दाखल असल्याने व सदर कागदपत्रे सार्वजनिक दस्तऐवज असल्याने ती मान्य करणे आवश्यक ठरते. मात्र उर्वरित कागदपत्रे वादींना पुराव्याचे कायदयातील तरतूदीनुसार सिध्द करणे आवश्यक ठरते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीतर्फे अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी गट क्र.२२५ ते २२७ व फेरफार क्र.४२४, ९२४ व ७८४ हे सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास नि.क्र.३२ ते ३७ देण्यात येते. |
| २. | वादीतर्फे अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी गट नं.२२५ ते २२७ चे मोजणी नकाशे हे कागदपत्र सार्वजनिक दस्तऐवज नसल्याने त्याबाबत वादीने पुराव्याचे कायदयातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित करण्यात येते. |
| ३. | वादीतर्फे अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी गट क्र.२२८ चा मोजणी नकाशा व सातबारा उतारा या कामी दाखल नसल्याने त्याबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.02.11 15:26:49 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक ११.०२.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H. A. Uchade. |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 11.02.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 11.02.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 11.02.2026 |